20-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/20/2025 12:22 AM Page 1




**CHANGE IN NAME**

I, **Joana Francisca Quadros,** H/No. 234, Manora, Raia, Salcete- Goa, 403720 would like to change my name from **Joana Francisca Moraes** to **Joana Francisca Quadros.** Hereinafter in all my future dealings and documents I, will be known as **Joana Francisca Quadros**

Sd/-

**Joana Francisca Quadros**

**CHANGE OF NAME**

I **NASIMA MAHAMAD PATHAN** R/o, Hno-23, Panditwada Ponda, Would like to change my name from **NASIMA MOHAMMAD PATHAN TO NASIMA MAHAMAD PATHAN.** Hereafter in all documents and dealing will be known by the name **NASIMA MAHAMAD PATHAN.**


# आगरवाडा चोपडेतील ओहळावर अतिक्रमण

## बेकायदेशीर बांधकाम करून ओहळ अडवण्याचा प्रयत्न

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १९ :** आगरवाडा चोपडे पंचायत क्षेत्रात मागच्या सहा महिन्यापूर्वी शापोरा नदी कनारी परिसरात ज्या ठिकाणी मिठांचे आगार आहे. त्या जमिनीत एक पारंपरिक ओहळ शेतामधून जात आहे, तो ओहळ सरकारी मालकीचा असून, त्या ओहोळावर काँक्रीट बांधकाम करण्यासाठी लोखंडी सगळ्या टाकून पूर्णपणे ओहळ अडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या संदर्भात पंचायतीने जलसिंचन खाते पेडणे विभागाला तक्रार दिल्यानंतर या घटनेचा पंचनामा केला होता.

पेडणे जलसिंचन अधिकाऱ्यांनी या ओहळासंबंधी आपला अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवला. परंतु आजपर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बेकायदेशीर अडवलेल्या ओहळावर कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यासाठी त्यांनी जलसिंचन विभागाला पत्र आले नसल्यामुळे पेडणे जलसिंचन विभाग सुस्त बनला आहे.

आगरवाडा चोपडेची ग्रामसभा १८ रोजी पंचायत कार्यालयात आयोजित केली होती. त्यावेळी या ओहोळाचा विषय ग्रामसभेत आल्याने नागरिकांनी या ओहळा विषयी पंचायतीला जाब विचारला. त्यानंतर उपसरपंच शिल्पा नाईक, स्थानिक पंच सदस्य संगीता नाईक यांनी आम्ही पंचायतीमार्फत जलसिंचन विभागाला पत्र आणि तक्रार दिली आहे. पुढील ॲक्शन ते विभाग घेतील, असे उत्तर दिले. तरीही ग्रामस्थांनी समाधान न झाल्यामुळे याविषयी तीव्र नाराजी व्यक्त करून जर पंचायतीने कारवाई केली नाही, तर शेतकऱ्यांना पुढाकार घेऊन कारवाई करावी लागेल, असा इशारा दिला.

चोपडे येथील शापोरा नदीच्या परिसरात सीआरझेड विभागाचे उल्लंघन करत मिठागरांमध्ये मातीचा भराव टाकून काँक्रिटीकरण करण्याचे काम सर्वत्र दिसून येत आहे. त्याच अनुषंगाने एका बिगर गोमंतकियाना ज्या ठिकाणी सरकारी ओहळ आहे. त्या ओहोळाच्या परिसरातील अलीकडील पलीकडील पूर्ण जमीन विकत घेऊन त्या ठिकाणी बांधकाम करण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. हे बांधकाम करत असताना ओहोळही त्यांनी पूर्णपणे अडवून ओहळामध्ये जाण्याची वाट होती ती वाटही बंद करण्याचा प्रकार घडला.

सीआरझेडचे उल्लंघन करताना सीआरझेड विभागाने या बांधकामाची पाहणी केली आहे. मिठागरामध्ये मातीचा भराव टाकून ज्या ठिकाणी बांधकामे केली जातात. त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही? असा सवाल ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये उपस्थित केला होता.

या ओहोळाच्या अलीकडे पलीकडे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची शेती असून पावसाळ्यात या शेतीची मशागत केली जाते. पावसाळ्यात या शेताचे भरलेले पाणी हेरवी या ओहोळामधून शापोरा नदिला मिळते. वाट जर मोकळी केली नाही तर, शेतातील पावसाचे पाणी कसे जाणार? आणि ओहोळ अडवणाऱ्या वर सरकार आज पर्यंत कारवाई का करत नाही? असा सवाल अनिल बगळी यांनी उपस्थित केला.



**सरकारी ओहळावर अतिक्रमण** (छाया निवृत्ती शिरोडकर )


**VILLAGE PANCHAYAT SANVORDEM, SANGUEM, GOA**

Ref. No.VPS/SAN/ 2025-26 / 319 **TENDER NOTICE** Date:- 19/05/2025.

The Sarpanch Village Panchayat Sanvordem, Taluka Sanguem-Goa, Invites sealed Percentage rate Tender from the eligible Contractor from the approved list of PWD/CPWD/Railways/MES/ for the execution of below Civil work on **29.05.2025 upto 12.00 noon.**

| Sr. No. | Name of work | Estimated amount put to tender (excluding GST) | EMD (Rs.) | Time period | Class of Contractor As per new registration | Cost of tender form |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of gutter from Sujay Fondekar house to Shailesh Sanvordekar house at Anandwadi in V.P. Sanvordem. | 256857.00 | 5137/- | 45 days | Class V & above RBLD / BLDS | Rs.4000/- |

Terms and Conditions :- **1.** Last date of receiving application **26/05/2025 up to 12.30 P.M.** along with cost of tender form (non-refundable) **2** . Date of issue of blank tender form **27/05/2025 upto 12.30 P.M. 3** . Date of receipt of sealed tender **29/05/2025 upto 12.00 noon** and will be opened on same day at **3.30 P. M. 4.** Application for issue tender form shall be accompanied with **a)** Attested copy of valid registration certificate of the contractor in the concern category of work **b)** Attested copy of PAN card **c)** Copy of valid registration Certificate and acknowledgement of upto date filed returns with ARN (Application Reference Number generated on GST comman portal) **d)** Declaration of the works in hand shall be submitted with detailed list indicating the present status on Rs. 50/- Stamp Paper (however tender form will not be issued to the person who has works in hand more than four times tendering limit). **5** . EMD shall be Demand Draft /DepositCall Receipt (DCR) /Pay order from Nationalised or Scheduled bank drawn in favour of The Sarpanch, V. P. Sanvordem, Payable at Sanvordem. **6.** Contractor shall submit separate application for each work. **7** . Unsealed and Conditional tenders will be rejected outright. **8.** The Contractor shall quote the Tender excluding GST & GST as applicable shall be paid Separately on total value of work executed **9**. For the Tender/ items of tender incase of being quoted abnormally below i.e. 20.00% Below the estimated cost, than the contractor shall furnish on demand an additional Performance security in the form of bank guarantee from National / Scheduled Bank for Amount which is worked out as difference between quoted amount and reasonable Amount Reduced by 20.00% **10** . Right to accept or reject any or all the tenders without assigning any reasons is reserved by this office. Seal

Sd/- ( Nitesh P. Bhandari ) Acting Sarpanch, Village Panchayat Sanvordem



**Indian Overseas Bank** इण्डियन ओवरसीज़ बैंक Good people to grow with www.iob.in

**इंडियन ओव्हरसीज बँक, फोंडा शाखा (1957)**
**राजकृष्ण टॉवर्स, बिल्डींग क्र. ए, गाळा क्र. 10-16, शांतीनगर, फोंडा–गोवा–403401 ईमेल : iob1957@iob.in**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलावाकरिता जाहीर सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा क्र. 54 वा) खाली बँकेकडे गहाण टाकलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री**

ज्याअर्थी, **इंडियन ओव्हरसीज बँकेच्या** प्राधिकृत अधिकाऱ्याने खालील कर्ज खात्यांमधील सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, **2002** च्या नियम **13(2)** खाली पाठवलेल्या मागणी सूचनांच्या अनुषंगाने खालील मालमत्तांचा ताबा त्या आमच्या पूर्ण देय रकमेची होईपर्यंत त्यावरील व्याज व किमतींसह बँकेला दि. **19.05.2025** रोजी देय असलेल्या **रु. 1,09,86,594.49/-** या रकमेची वसुली करण्याकरिता **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे,व तेथे जे जे काही आहे** या तत्वावर विकण्याच्या हक्कासह घेतला आहे आणि त्याअर्थी, सदर देय रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने सदर कायद्याच्या कलम **13(4)** खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांसह सदर मालमत्तांच्या विक्रीद्वारे बँकेला देय रकमेची वसूली करण्याचा प्रस्ताव आहे. खाली सही करणाऱ्याद्वारे **https://baanknet.com** या वेबपोर्टलवर पुरविलेल्या ई–ऑक्शन प्लॅटफॉर्मद्वारे सदर विक्री केली जाईल.

**कर्जदार/गहाणवटदाराचे नाव व पत्ता : मे. अनंत मार्केटिंग (प्रोप्रा.: श्री. सिद्धेश आनंद शेट वेरेकर), पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**, **कायम पत्ता :** गाळा क्र. **13**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**., **पत्रव्यवहाराचा पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**, कार्यालय **पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**

**2. मे. मयूर सेल्स कॉर्पोरेशन (प्रोप्रा. : सिद्धेश आनंद शेट वेरेकर), पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**, **कायम पत्ता : पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**, **पत्रव्यवहाराचा पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**, **कार्यालय पत्ता :** गाळा क्र. **1**, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा **403401**

**3. श्री. सिद्धेश आनंद शेट वेरेकर, श्री. रुद्रेश शेट वेरेकर, श्री. आनंद गोविंद शेट वेरेकर व श्रीमती अश्विनी आनंद शेट वेरेकर, कायम पत्ता :** बंगला क्र. **4**, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा **403401**, **पत्रव्यवहाराचा व कार्यालय पत्ता :** बंगला क्र. **4**, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा **403401**.

**हमीदार/गहाणवटदारांचे नाव व पत्ता : 1. श्री. सिद्धेश आनंद शेट वेरेकर,श्री. रुद्रेश शेट वेरेकर, श्री.आनंद गोविंद शेट वेरेकर व श्रीमती अश्विनी आनंद शेट वेरेकर, सर्व राहणार :** बंगला क्र. **4**, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा **403401**.

**एनपीए तारीख : 28.05.2024, मागणी सूचना तारीख : 06.06.2024,**
**मागणी सुचनेतील दावा केलेली देय रक्कम : दि. 01.06.2024 रोजी रु. 95,54,603.12/- अधिक त्यापुढील व्याज व किमती.**
**ताबा घेतल्याची तारीख : 16.12.2024, कब्जा सुचनेतील दावा केलेली देय रक्कम : दि. 16.12.2024 रोजी रु. 1,03,11,359.54/-** अधिक त्यापुढील व्याज व किमती.
**दि. 19/05/2025 रोजी देय रक्कम : रु. 1,09,86,594.49/-** अधिक त्यापुढील व्याज व किमती.
***स्थानिक स्व शासन (मालमत्ता कर, पाणी सांडपाणी, वीज देयके इ.) : माहित नाहीत.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :**

फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा येथील सर्व्हे क्र. **204/7** असलेल्या घरभाट या नावाच्या मालमत्तेच्या क्र. **23** मध्ये बांधलेल्या ब्लॉक क्र. **4** असलेल्या बंगल्याचे समभाग गहाणवट. प्लॉटचे क्षेत्रफळ **370** चौ.मी. आहे. बंगल्याचे बिल्ट अप क्षेत्रफळ **160** चौ.मी. आहे. सदर बंगला **श्री. आनंद गोविंद शेट वेरेकर, श्रीमती अश्विनी आनंद गोविंद शेट वेरेकर, श्री. सिद्धेश आनंद गोविंद शेट वेरेकर व श्री. रुद्रेश आनंद गोविंद शेट वेरेकर** यांचे नावे असून बंगल्याशी निगडीत प्लॉटचे क्षेत्रफळ **179** चौ.मी. आहे.

| सुरक्षा तपशील | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| वर दिलेली मालमत्ता | रु. 86,70,455.00 | रु.8,67,045.50/- | रु. 50,000.00/- |

**लिलावाची तारीख व वेळ : 09.06.2025 सकाळी 10.00 ते संध्या. 4.00**
**बोली वाढ रक्कम : रु. 50,000/-.** स्वयंचलित विस्तार वेळ : **10** मिनिटे
ज्ञात भार, काही असल्यास : काही नाही.
**पाहणी तारीख व वेळ : 20.05.2025 ते 08.06.2025** दरम्यान **सकाळी 10.00 ते संध्या. 5.00** या कार्यालयीन वेळेत,
बोलीदारांनी ग्लोबल ईएमडी वालेट खात्यात **20.05.2025 सकाळी 10.00 ते 09.06.2025 रोजी संध्या. 4.00** पूर्वी ऑनलाईन प्रणालीने ईएमडी भरणा जमा करावा.
*** सांविधिक देय रकमांपेक्षा बँकेच्या देय रकमेस जास्त महत्व आहे.**
**अटी व शर्तींसाठी कृपया भेट द्या : https://baanknet.com/**

**दिनांक : 19.05.2025**
**ठिकाण : फोंडा**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**इंडियन ओव्हरसीज बँक**



केनरा बैंक Canara Bank भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking सिंडिकेट Syndicate

**एआरएम शाखा, पहिला मजला, मतियाज प्लाझा, 18 जून मार्ग, पणजी, गोवा –403001**
**मोबा.: 77220 39869, ईमेल : cb5103@canarabank.com**

**विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) व 9 खाली स्थावर मालमत्तांच्या आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 6(2) खाली जंगम मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, **2002** सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, **2002** च्या तरतुदींखाली येथे खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्ता ज्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत त्या जाहीर लिलावाने विकल्या जातील, अशी नोटीस याद्वारे देण्यात येत आहे.

**1. सुरक्षित धनकोचे नाव पत्ता : कॅनरा बँक, एआरएम शाखा, पणजी, गोवा**

**2. कर्जदार / हमीदाराचे नाव व पत्ता : मेसर्स आदित्य बिवरेजेस (प्रोप्रा. आदित्य शशी कामत पणजीकर) (कर्जदार),** प्लॉट क्र. ए/**5**, मडकई औद्योगिक वसाहत, मडकई, फोंडा, गोवा **403404**.
**मेसर्स आदित्य रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स (प्रोप्रा. आदित्य शशी कामत पणजीकर), (कर्जदार),** श्री नवदुर्गा मंदिरानजीक, सर्व्हे क्र. **281/3**, मडकई गाव, फोंडा, गोवा **403404**.
**मेसर्स आदित्य पॉलीमर्स (प्रोप्रा. श्री. सनी शशी कामत पणजीकर) (कर्जदार),** प्लॉट क्र. ए–**5**, मडकई औद्योगिक वसाहत, मडकई, फोंडा, गोवा **403404**.
**श्री. आदित्य शशी कामत पणजीकर (कर्जदार / हमीदार)**, पत्ता **1** : पणजीकर अपार्टमेंट्स, घर क्र. **49-3**, वेलिंग, म्हार्दोळ, गोवा **403404**.
**पत्ता 2** : शशी, घर क्र. **104-1**, सर्व्हे क्र. **8/8**, भाटले, वेलिंग, म्हार्दोळ, गोवा **403404**.
**श्री. सनी शशी कामत पणजीकर, (कर्जदार / हमीदार),** पत्ता **1** : पणजीकर अपार्टमेंट्स, घर क्र. **49-3**, वेलिंग, म्हार्दोळ, गोवा **403404**.
पत्ता **2** : शशी, घर क्र. **104/1**, सर्व्हे क्र. **8/8**, भाटले, वेलिंग, म्हार्दोळ, गोवा **403404**.
**श्रीमती प्रियांका भाऊसाहेब देसाई (ऊर्फ प्रियांका सनी शशी कामत पणजीकर) (हमीदार),** घर क्र. **49-3**, तळेवाडा कॉलनी, वेलींग, म्हार्दोळ, गोवा **403404**.
**श्रीमती विनिशा विनय गावस (ऊर्फ विनिशा आदित्य शशी कामत पणजीकर) (हमीदार),** माऊली बंगला, जोफिल नगर, फोंडा, गोवा **403401**.
श्रीमती किशोरी श्यामसुंदर सिनारी, (हमीदार), जानकी निवास, घर क्र. **1**, चिखली कॉटेज हॉस्पिटल, चिखली, मुरगाव, दक्षिण गोवा **403710**.

**3.** दि. **30/04/2025** रोजी एकूण दायित्वे : **रु.5,98,02,551.78 (रु. पाच कोटी अठ्ठ्याण्णव लाख दोन हजार पाचशे एक्कावन्न व पैसे अठ्ठ्याहत्तर फक्त)** अधिक कॅनरा बँकेस देय **01/05/2025** पासून त्यावर साठलेले त्यापुढील व्याज, इतर चार्जेस/खर्च इ.

**4. (अ) लिलावाची प्रणाली : ई–लिलाव (ब) लिलाव सेवा पुरवठादाराचा तपशील :** मे. पीएसबी अलायन्स (**Ebkray/Baanknet**), संपर्क अधिकारी : मे. पीएसबी अलायन्स (**Ebkray/Baanknet**), संपर्क क्र. : **8291220220**, ईमेल आयडी : **support.ebkray@psballiance.com** आणि **https://baanknet.com/ (क) लिलावाची तारीख व वेळ : 17/06/2025** वेळ : **सकाळी 11.00-12.00 (लिलाव पूर्ण होईपर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्यादित विस्तार वेळेसह)(ड) लिलावाचे ठिकाण : https://baanknet.com/**

**5. मालमत्ता/राखीव किंमत/ईएमडी तपशील :**

**ज्ञात भारांसह, काही असल्यास स्थावर मालमत्तेचा तपशील व पूर्ण वर्णन**

सर्व्हे क्र. **281/13** खाली सर्वेक्षित उत्तर गोव्यातील तालुका व उपजिल्हा फोंडामधील मडकई ग्रामपंचायतीत निवासी इमारतीसह **2375.00** चौ.मी. एकूण क्षेत्रफळासह जमिनीचा सर्व भाग.
**चतु:सीमा : उत्तरेस :** सर्व्हे क्र. **281/12** असलेली मालमत्ता, **दक्षिणेस :** सर्व्हे क्र. **139/1** असलेली मालमत्ता, **पूर्वेस :** रस्ता, **पश्चिमेस :** सर्व्हे क्र. **141/5, 141/8, 141/10** व **141/11.**
* भौतिक ताब्यातील मालमत्ता.

**राखीव किंमत : रु. 1,40,00,000.00 (रु. एक कोटी चाळीस लाख फक्त)**

**बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) : रु. 14,00,000.00 (रु. चौदा लाख फक्त)**

**5. इतर अटी व शर्ती :** अ. सदर मालमत्ता **'जसे आहे जेथे आहे, 'जे आहे जे काही आहे 'आणि 'तेथे जे जे काही आहे** 'या तत्वावर भार, काही असल्यास, त्यासह विकल्या जातील. ब. मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीत विकल्या जाणार नाहीत. क. सदर मालमत्ता **सकाळी 10.00 ते संध्या. 05.00** या वेळात कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राधिकृत अधिकाऱ्यांची पूर्ववेळ घेऊन पाहता येतील.
ड. इच्छुक बोलीदारांनी मेसर्स पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड (ई–बीकेआरएवाय) यांच्या ई–वॅलेट मध्ये दिलेल्या मुद्दा क्र. **5** मधील तपशीलानुसार पोर्टलवर **16/06/2025** रोजी संध्या. **05.00** पर्यंत वा त्याआधी थेट राखीव किंमतीच्या **10%** दराने बयाणा रक्कम ठेवीचा (ईएमडी) भरणा जमा करावा किंवा सदर चलनात दिलेल्या खाते तपशीलातील आरटीजीएस/एनईएफटी द्वारे ईएमडी जमा करून चलान तयार करावे. बोलीदारांना त्यांच्या बोली **रु. 100000.00 (रु. एक लाख फक्त)** वा त्याच्या पटीत वाढवता येतील. लिलाव–बोली **https://baanknetcom/** या संकेतस्थळावरून **17/06/2025** रोजी सकाळी **11.00-12.00** या वेळात फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग द्वारेच घेतला जाईल.
इ. अधिक तपशीलासाठी एआरएम शाखा, पणजी शाखा यांना कोणत्याही कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा. संपर्क क्र. मो. **+ 91 7722039869/7353372267/9730515988,** ईमेल : **cb5103@canarabank.com** किंवा सेवा पुरवठादार मेसर्स पीएसबी अलायन्स **(Ebkray/Baanknet) - 7046612345/8291220220/982219848/81602055051,** ईमेल : **support.ebkray@psballiance.com** आणि **support.ebkray@procure245.com,** संकेतस्थळ: **https://baanknet.com /.**
जर बोलीदारांकडे इंटरनेट ॲक्सेस नसल्यास तरीही ई–लिलावात भाग घेण्यास ते इच्छुक असल्यास त्यांनी मंडल कार्यालय किंवा एआरएम शाखा यांना संपर्क करावा, सुविधा केंद्र म्हणून ते आवश्यक व्यवस्था करतील.

**दिनांक : 19.05.2025**
**ठिकाण : पणजी**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**


पान १ वरून

## दुचाकीस्वाराच्या धडकेत महिलेचा मृत्यू; पती व मुलगी गंभीर जखमी

अंतर्गत कलम २८१ (धोकादायक वाहन चालवणे), १२५(अ) (गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरणे) आणि १०६(१) (मृत्यूस कारणीभूत ठरणे), तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक आनंद शिरोडकर व मुरगावचे पोलीस उपअधीक्षक गुरुदास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश भोमकर करत आहेत.

# आगरवाडा बोडको धेनू उतरणीवर गतिरोधकाची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १९ :** येथील आगरवाडा बोडको धेनु धोकादायक वळणावर वाहनचालकांचा ताबा राहत नसल्याने नित्य अपघात सत्र सुरूच असल्याने त्याठिकाणी रम्बलर वा गतिरोधक उभारण्याची मागणी वाहन चालकातून होत आहे.

काल १८ रोजी संध्याकाळी चारच्या सुमारास देशी दुचाकीस्वार युवतीचा दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वळणावर कलंडल्याने जबर जखमी व दुखापत झाली.त्यांच्या बरोबर अन्य साथीदार होते,त्यामुळे बिचारी पर्यटक बचावली. १०८ रुग्णवाहिकेतून इस्पितळात दाखल करण्यात आले. दरम्यान,सदर धोकादायक वळणावर वाहनचालकांचा ताबा सुटण्याच्या अनेक घटना घडल्या असून, कित्येकजण जायबंदी तर दोन चार दिवसातून किमान एक घटना घडत असल्याचे ग्रामस्थ जयंत नाईक यानी सांगितले.

त्या ठिकाणी रम्बलर किंवा गतिरोधक उभारण्याची गरज असल्याचे मत वाहनचालक संदीप नाईक यांनी व्यक्त केले.हा भाग पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असल्याने देशी विदेशी पर्यटक दुचाकी व अन्य वाहनाने प्रवास करीत असतात.मात्र दोन्ही बाजूंनी चढण असल्याने वाहने वेगाने येत असतात,परिणामी व्हि' आकाराचे वळण असल्याने वाहन अचानक वळविल्यानंतर अपघात नित्य होतच असतात.ते टाळण्यासाठी एकदम सेंटर पॉइंटवर रंबलर अत्यावश्यक असल्याचे नाईक यानी सांगितले.

दरम्यान, या वळणावर पोचल्यानंतर वाहन चालक भांबावून जात वाहन सोडून देतो किंवा वाहनांसह धडक देत कोसळून पडतो. त्यामुळे रंबलर आवश्यक असून किमान वाहनाची गती कमी होईल व अपघात संख्या घटतील, असे मत संदीप नाईक यांनी व्यक्त केले.

# सिकेरी येथे २४ पासून 'मये सांस्कृतिक महोत्सव'




**सिकेरी : मये महोत्सवाची माहिती देताना रुपेश ठाणेकर, दयानंद कार्बोटकर, रुपेश लिंगूडकर, डॉ. प्रवीण सावंत, उदय पत्रे व मान्यवर.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १९ :** रायझिंग युथ मये, कला संस्कृती खाते गोवा सरकार, विजयानंद ज्ञान प्रसारक संस्था व महामाया हायस्कूल माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरा मये सांस्कृतिक महोत्सव २४ व २५ रोजी दोन दिवस गोमातेच्या सानिध्यात सिकेरी गोशाळेत थाटात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष रुपेश ठाणेकर, मोहनदास गावकर, स्वागताध्यक्ष दयानंद कारबोटकर, शाबा पेडणेकर मयूर प्रभू गावकर डॉ. प्रवीण सावंत, रुपेश लिंगूडकर, उदय पत्रे व इतरांनी पत्रकार परिषदेत दिली.

२४ रोजी ४.३० वाजता उद्घाटन होणार असून राज्यसभा खासदार सदानंद तानावडे आमदार प्रेमेंद्र शेट जिल्हा अध्यक्ष शंकर चोडणकर, महेश सावंत, दयानंद कार्बोटकर कृष्णा चोडणकर व इतर पंचायत सदस्य उपस्थित असतील.

यावेळी विजय मांद्रेकर, सुनील पिळगावकर, सावळा चोडणकर, रवींद्र धुरी या कलाकारांचा सत्कार होणार आहे. त्यानंतर लोककलामहोत्सव होणार असून गोव्याच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडणार आहे.

समारोप सोहळा रविवारी२५रोजी सायंकाळी ४.३० वाजता होणार असून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत प्रमुख पाहुणे असतील तसेच भाजप अध्यक्षा दामोदर नाईक, धर्मा चोडणकर, डॉ. स्नेहा भागवत शर्मिला वळवईकर व इतर मान्यवर उपस्थित असतील.

यावेळी कीर्तनकार शिवलीताई पाटील, शुभदा गावकर, सिताराम सावंत, कमलावती चोडणकर यांचा सत्कार होणार आहे. त्यानंतर ह.भ.प शिवालीताई पाटील यांचे नाविन्यपूर्ण किर्तन होणार आहे. या उत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित लावावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी गोसेवक कमलाकांत तारी यांनामये रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेस यावेळी रुपेश लिंगूडकर, उदय पत्रे, उमेश गडेकर, सर्वेश पेडणेकर आदी उपस्थित होते.

# हरमल किनारीभागात तेलगोळे

## पर्यटक व मच्छिमारामध्ये चिंता | परिसर विद्रूप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १९ :** येथील किनारी भागात पावसाळ्यापूर्वी काळे ठीक्कर तेलगोळे पसरले आहे. पर्यटक व मच्छिमार बांधवानी चिंता व्यक्त केली आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा तेलगोळे जास्त पसरल्याने पूर्ण परिसर विद्रूप झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

पर्यटन हंगामात किनाऱ्याची रया बदलत असल्याने कित्येक समस्या उद्भवत असतात. त्यात म्हत्वाची म्हणजे खोल समुद्रात मोठ्या मालवाहू जहाजे व अन्य छोटे लहान बोटी, टाकाऊ इंधन व साहित्य पाण्यात सोडतात, असा प्राथमिक अंदाज असल्याचे मत आहे. त्याचा परिणाम पाणी प्रदूषित होते व मत्स्य उत्पादन वाढीसाठी पोषक वातावरण नसल्याने हानिकारक होत असल्याचे मच्छिमार बांधव आवेलिन मशादो यांनी सांगितले.

या किनारी भागांत तेलगोळे पसरल्याने पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली. किनाऱ्यावरून चालत जाणे धोक्याचे असून पाय व अंगाला खाज सुटते, असे काहींनी सांगितले. याबाबत दरवर्षी पर्यटन खात्याकडून इशारा दिला जातो. मात्र पावसाळ्यापूर्वी नित्याचे झाले आहे. जलचर प्राण्यांना जीवघेणे असून मत्स्य उत्पादन घट होण्याची शक्यता मच्छिमार बांधव व्यक्त करतात. तरी प्रदूषण नियंत्रण मंडळ व सबंधित खात्याने या गंभीर प्रश्नावर योग्य उपाययोजना करून विद्रूप किनारा व पर्यटकाना होणारे त्रास आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न व पावले उचलावीत अशी मागणी होत आहे.



# 'मनस्पर्शी' कवितासंग्रहाचे प्रकाशन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १९ :** मनस्पर्शी मधील कविता केवळ भावभावना व्यक्त करणाऱ्या नाहीत तर त्या चिंतनाच्या अंगाने जाणाऱ्या आहेत. कविता ही अनुभव देण्यासाठी असते व ती नादातून आली पाहिजे, असे मत गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा कवी, समीक्षक प्राचार्य अनिल सामंत यांनी येथे व्यक्त केले.

कोकण मराठी परिषद गोवा आणि इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी प्रसिद्ध लेखिका डॉ. रेखा पौडवाल यांच्या 'मनस्पर्शी' या कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयएमबीच्या परिषदगृहात पार पडला त्यावेळी प्रमुख वक्ते या नात्याने बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी माजी केंद्रीय कायदा मंत्री ड. रमाकांत खलप, कार्यक्रमाचे अध्यक्ष आयएमबी चे अध्यक्ष दशरथ परब कोमप गोवाचे अध्यक्ष सागर जावडेकर, सचिव चित्रा क्षीरसागर, कवयित्री डॉ.रेखा पौडवाल उपस्थित होत्या. ड. खलप यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ते म्हणाले, या संग्रहातून भारतमातेचे अंतरंग, भारतमातेची वेदना उलगडली आहे. आपल्या भाषा कशा चिरंतन राहतील हे आपण पाहिले पाहिजे. सागर जावडेकर यांनी स्वागत केले. दशरथ परब यांनी या संग्रहातील कविता वाचनीय असल्याचे सांगितले. डॉ. रेखा पौडवाल म्हणाल्या, मी गोवा वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टर म्हणून नोकरी करताना नेहमी रुग्णांशी संवाद साधत गेले. त्यांच्या वेदना जाणून घेतल्या व हे अनुभव शब्दबद्ध करत गेले. प्राचार्य सामंत यांनी सांगितले की, गोव्याला कृष्णदास श्यामा, बोरकर, रामाणी आदी थोर कवींपासून कवितेची मोठी परंपरा आहे व ती जोमाने पुढे जातांना दिसते. गोवा मराठी अकादमीतर्फे गेल्यावर्षी ९० पुस्तके तर यंदा ४५ पुस्तके प्रकाशित झाली ही समाधानाची गोष्ट आहे.

प्रिया व प्रीती पौडवाल यांनी मान्यवरांचा सन्मान केला. यावेळी संग्रहाला प्रस्तावना लिहिलेले डॉ.विनय मडगावकर यांचा सत्कार करण्यात आला.चंद्रशेखर गावस यांनी सूत्रसंचालन केले तर चित्रा क्षीरसागर यांनी आभार मानले.



**पणजी : 'मनस्पर्शी' काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना ॲड. रमाकांत खलप सोबत चंद्रशेखर गावस, डॉ. विनय मडगावकर,बाळकृष्ण पौडवाल, प्राचार्य अनिल सामंत, दशरथ परब, सागर जावडेकर, रेखा पौडवाल व चित्रा क्षीरसागर.**